# बृहन्मुंबईमहानगरपालिका

**लोकमान्य टिळक महानगरपालिक सर्वसाधारण रुग्णालय,** शीव, **मुंबई – २२**

क्र.लो.टि.रु./२४२९१/व.आ      दिनांक: ०९.१०.२०२३

**जाहिरातीचा नमुना**

लोकमान्य टिळक महानगरपलिका सर्वसाधारण रुग्णालयात स्वच्छता निरिक्षकांची 10 पदे कंत्राटी पद्धतीने एक वर्षाकरीता भरण्यासाठी अर्ज मागविण्यात येत आहेत.

स्वच्छता निरिक्षक पदासाठीबृहन्मुंबईमहानगरपालिकेच्यासंकेतस्थळावरुनअर्जाच्यानमुन्याचीप्रत (Print) काढूनत्यासोबतशैक्षणिकअर्हतेचीसर्वकागदपत्रेजोडूनसदरअर्जलोटिमसरुग्णालय, कॉलेजइमारत, तळमजला, रुमनं. 14, वरिष्ठआस्थापनाविभागातसादरकरावेततसेचकागदपत्रांचीपडताळणीकेल्यानंतररुपये 640 +18% जीएसटी रु.115/- एकूण रु.755/-(रुपये सातशे पंचावन्न फक्त) इतके शुल्क लो.टि.म.स. रुग्णालयाच्या रोखपाल विभागात दि.12.10.2023 ते 20.10.2023 पर्यंत कार्यालयीन वेळेत (शनिवार तसेच रविवार व सार्वजनिक सुट्टी वगळून) सकाळी 11.00 ते दुपारी 3.00 वाजेपर्यंत भरुन, त्याची मूळ पावती अर्जासोबत जोडून अर्ज लो.टि.म.स. रुग्णालयाच्या आवक/जावक विभागात दि.25.10.2023पर्यंत सादर करावेत. (दूरध्वनी क्रं. 022 2407 6381/2406 3000)

| अनु. क्र. | पदाचे नाव | कालावधी | एकूण पदे | निश्चितठोकप्रतिमाहमानधन |
|---|---|---|---|---|
| 1. | स्वच्छता निरिक्षक | 1 वर्ष | 10 | Rs.25000/- |

**शैक्षणिक अर्हता –**

**१.** उमेदवाराने बारावीची परीक्षा उत्तीर्ण केलेली असावी तसेच सॅनिटरी इन्स्पेक्टरचा डिप्लोमा अथवा हेल्थ इन्स्पेक्टरचा डिप्लोमा केलेला असावा.
**२.** संबंधित कामाचा 3 ते 5 वर्ष अनुभव असणे संयुक्तिक.
**३.** वयोमर्यादा – दिनांक 01.10.2023 रोजी वय वर्षे 18 पेक्षा कमी व 38 वर्षापेक्षा जास्त नसावे.
**४.** मराठीचे लेखी व तोंडी ज्ञान असणे आवश्यक.
**५.** ही नेमणूक केवळ तात्पुरत्या स्वरुपात असेल व उमेदवारास कोणत्याही प्रकारे नियमित कायम स्वरुपी नोकरीवर हक्क सांगता येणार नाही.
**६.** रु. 25000/- प्रति माह ठोक वेतन मिळेल.

**सर्वसाधारण अटी व शर्ती :**

1. कंत्राटी “स्वच्छता निरिक्षक यांना दरमहा एकूण रु. 25000/- इतके ठोक मानधन मिळेल या वेतना व्यतिरिक्त कोणत्याही प्रकारचा महागाई भत्ता, घरभाडे भत्ता इत्यादी अनुज्ञेय असणार नाही.

2. उपरोक्त पदांची कंत्राट तत्वावर नियुक्ती एका वेळी सहा महिन्यापर्यंत व कमाल एक वर्षा करीता अशा प्रकारे करण्यात येईल.
3. त्यांच्या सेवेच्या कालावधीमध्ये त्यांची सेवा दर 29 दिवसापूर्वी एक दिवस खंडीत करण्यात येईल.
4. सदर उमेदवारांना रुग्णालयात तिन्ही पाळीमध्ये चक्रांकित पध्दतीने काम करावे लागेल.
5. उमेदवारास नियुक्त केलेल्या विभागातील सत्रांनुसार साप्ताहिक रजा व परिपत्रक क्र. संचालक/वै.शि.प्र.रु./3644 दि. 14.10.2022 अन्वये मंजुर केलेल्या 15 नैमित्तिक रजा अनुज्ञेय असेल त्या व्यतिरिक्त इतर कोणतीही रजा अनुज्ञेय नाही.
6. कंत्राटी कालावधीत त्यांचे काम समाधानकारक न आढळल्यास कोणतीही पूर्व सुचना न देता सेवा समाप्त केली जाईल.
7. त्यांची नेमणूक करार पध्दतीची असल्यामुळे त्यांना कोणत्याही न्यायालयात जाता येणार नाही.
8. बृहन्मुंबई महानगरपालिका सेवा नियमावलीनुसार ही नेमणुक झाली नसल्यामुळे त्या अनुषंगाने मिळणारे निवृत्ती वेतन, भविष्य निर्वाह निधी अथवा तत्सम कोणत्याही प्रकारचे लाभ मिळण्यास ते पात्र राहणार नाहीत.
9. त्यांची नियुक्ती पोलीस ना हरकत प्रमाण पत्र नियुक्ती दिनांका पासुन 15 दिवसांच्या आत सादर करण्यासापेक्ष करण्यात येईल.
10. नियुक्तीचे वेळी उमेदवाराकडुन रु.100/- बाँड पेपर वर करारनामा करुन घेण्यात येईल.
11. ते दररोज नियमाने हजेरी पटावर त्यांच्या कर्तव्याच्या वेळेनुसार स्वाक्षरी करतील अन्यथा त्यांना गैरहजर धरण्यात येईल.त्यांची विना परवानगी गैरहजेरी विनावेतनी गैरहजेरी करण्यात येईल .
12. जाहिरात देऊन अर्ज मागवून अर्हता पात्र उमेदवारांच्या मुलाखती घेण्यात येतील. निवड झालेल्या उमेदवारांमधून दहा उमेदवारांच्या नेमणूका करून आणखीन पाच उमेदवार प्रतिक्षायादी वर ठेवण्यात येतील. एक वर्षाच्या कालावधीत नेमलेल्या दहा उमेदवारांपैकी कोणीही सेवा सोडून गेल्यास प्रतिक्षायादीतील उमेदवारांमधून नेमणूका करण्यात येतील.
13. सदर पदासाठी50 पेक्षा अधिक पात्र उमेदवारांचे अर्ज प्राप्त झाल्यास केवळ प्रथम 25 पात्र उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलाविण्यात येईल .

**डॉ. मोहन जोशी,**
**अधिष्ठाता**
**लोटिमवैम व लोटिमस रुग्णालय,**
**शीव, मुंबई ४०० ०२२**

**बृहन्मुंबई महानगरपालिका**

**लो.टी.म.सवैद्यकीय महाविद्यालय व सर्वसाधारण रूग्णालय, शीव, मुंबई४०० ०२२.**

**दूरध्वनी क्रं. - ०२२-२४०६६३८१-८९**

**<u>अर्जाचा नमुना</u>**

**पदाचे नाव: 'स्वच्छता निरिक्षक'**

1) संपूर्ण नाव (आडनांव प्रथम) मराठीत:

____________________________________________

2) वडिलांचे संपूर्ण नाव: _______________________________________________________

3) विवाहापूर्वीचे संपूर्ण नाव (महिलांकरिता): ________________________________________

4) पत्ता व दूरध्वनी क्रमांक: _____________________________________________________

______________________________________________________________________

5) लिंग- पुरुष __________स्त्री ____________

6) जन्मदिनांक: दिनांक______ महिना______ वर्ष _______

दिनांक- 01.10.2023रोजी असलेले वय ______ महिने _____ दिवस___

7) शैक्षणिक अर्हता:

| **शैक्षणिक अर्हता** | **शालांत परीक्षा मंडळ/विद्यापीठाचे नाव** | **गुणांचा तपशील** | | | **उच्च माध्यमिक शालांत परीक्षेतील गुण** | | **उमेदवार किती प्रयत्नात परीक्षा उत्तीर्ण झाला** |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | प्राप्त गुण | पैकी | टक्केवारी | मराठी | इंग्रजी | |
| दहावी | | | | | | | |
| बारावी | | | | | | | |
| पदवी | | | | | | | |
| पदविका | | | | | | | |
| इतर | | | | | | | |

8) अनुभव: ______________________________________________________________

9) स्थानिक पोलीस ठाण्याचा पूर्ण पत्ता: __________________________________________

______________________________________________________________________

**10)**उंची: __ फूट __ इंच, वजन: ____ कि.ग्रा., शरीराची ठेवण: किरकोळ / मध्यम / सुदृढ / वर्ण:

______ नेत्र वर्ण: ______ वैयक्तिक खूण: _______________

**11)**संगणकविषयक ज्ञान: MS-CIT किंवा शासनाने विहित

केलेल्या संगणक विषयक अभ्यासक्रमाचे प्रमाणपत्र: आहे / नाही

**12)**उमेदवार सध्या नोकरी करीत आहे किंवा नाही ? – होय / नाही

असल्यास त्याबाबतचा तपशील: _________________________________

____________________________________________________________

____________________________________________________________

**13)**उमेदवाराविरुद्ध पोलीस चौकशी / न्यायालयीन प्रकरण प्रलंबित /
प्रस्तावित आहे का ? असल्यास त्याबाबतचा तपशील द्यावा. होय / नाही

**14)**उमेदवारास पूर्वी शिक्षा झाली होती का ? शिक्षा झाली होय / नाही
असल्यास, शिक्षेचा तपशील नमूद करण्यात यावा व न्यायालयीन निर्णयाची प्रमाणित प्रत अर्जासोबत जोडण्यात यावी.

**15)** मी या अन्वये प्रतिज्ञापूर्वक असे जाहीर करतो / करते की, वरील माहिती जाणीवपूर्वक तसेच विश्वासपूर्वक दिली असून, ती खरी आहे. जाहिरातीत दिलेल्या सर्व निकषांवर व शैक्षणिक अर्हतेनुसार मी पात्र आहे. त्यापैकी कोणतीही माहिती खोटी आढळल्यामुळे माझा अर्ज फेटाळून लावल्यास किंवा निवडीच्या कुठल्याही टप्प्यावर माझी उमेदवारी रद्द केल्यास माझी काहीही तक्रार राहणार नाही.

**आपला / आपली विश्वासू,**

**अर्जदाराची सही**
**(अर्जदाराचे नाव)**

**दिनांक:**